**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक ०४ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सायंकाळी अहमदाबाद इथं आयोजित पहिल्या जागतिक योगासन क्रीडास्पर्धेला संबोधित करणार.**
2. **विधानपरिषदेच्या निवडणुकीत विदर्भातल्या पाच जागांसह राज्यातल्या सर्व सतरा जागांवर महायुतीचा विजय होईल असा चंद्रशेखर बावनकुळे यांना विश्वास.**
3. **यवतमाळ इथून शिवसेना उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी तर वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातून भाजप उमेदवार अरुण लखानी यांची विधान परिषदेवर बिनविरोध निवड निश्चित.**
4. **जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन पंधरवड्यासह विविध कार्यक्रमांचं उद्या नागपुरात आयोजन.**

------------------------------------------------------

जागतिक योगासन क्रीडास्पर्धा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सायंकाळी अहमदाबाद इथं आयोजित पहिल्या जागतिक योगासन क्रीडास्पर्धेला आभासी पद्धतीनं संबोधित करणार आहेत. जगभरात योगाभ्यासाला प्रचंड लोकप्रियता मिळत असून, या व्यासपीठाने जगभरातल्या योग प्रेमींना एकत्र आणल्याचं पंतप्रधानांनी यासंदर्भात समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. योगासनासाठीच्या जागतिक क्रीडा वाटचालीतला हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. या स्पर्धेत आशिया, युरोप, अमेरिका, आफ्रिका आणि ओशियानीया मधल्या सुमारे ७५ देशांतले ५०० हून अधिक खेळाडू सहभागी होत आहेत.

------------------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीकडे स्पष्ट संख्याबळ असून विदर्भातील पाचही जागांसह राज्यातील सर्व १७ जागांवर महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपूर विमानतळावर

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेत्यांनी अपक्ष उमेदवारांशी चर्चा केल्याने बहुतांश अपक्ष अर्ज मागे घेतील, असं त्यांनी सांगितलं. कळमना बाजार समितीला राष्ट्रीय स्तरावरील बाजार समितीचा दर्जा मिळाल्याने विदर्भाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असही ते म्हणाले. दरम्यान, विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. ठाणे-पालघर मतदारसंघातले राष्ट्रवादी  काँग्रेस पक्षाचे उमेदवार अभिजीत पवार यांनी आज उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे शिवसेनेच्या रवींद्र फाटक यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने यांनी आज अर्ज मागे घेतला.

-----------------------------------------------------

बिनविरोध निवड

यवतमाळ स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे शिवसेना उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी काँग्रेसचे साहेबराव कांबळे, भाजपचे बंडखोर नितीन भुतडा, राष्ट्रवादी काँग्रेसचे साजिद बेग आणि अपक्ष फारुक सय्यद यांनी अर्ज मागे घेतल्यानं चतुर्वेदी हे एकमेव उमेदवार उरले. त्यामुळे निवडणूक अविरोध झाली असून महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तर वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपचे अधिकृत उमेदवार अरुण लाखानी यांची महाराष्ट्र विधान परिषदेवर बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे शैलेश अग्रवाल आणि सुधीरचंद्र कोठारी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आज अंतिम दिवशी दोन्ही उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने अरुण लखानी यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

-----------------------------------------------------

ठिय्या आंदोलन

गडचिरोली जिल्ह्याला ‘स्टील हब’ बनविण्याच्या हेतूने प्रस्तावित स्टील प्रकल्प आणि विमानतळासाठी सुरु असलेल्या सुपीक जमिनींच्या अधिग्रहणा विरोधात आजपासून गडचिरोली आणि चामोर्शी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी शेतकरी संघर्ष कृती समितीच्या नेतृत्वात ठिय्या आंदोलन सुरु केलं आहे. आज हजारो शेतकरी, महिला आणि मुले बैलगाड्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयापुढे पोहचत दिवसभर

ठिय्या आंदोलन करण्यात आलं. कुणबी समाज सेवा समिती, तेली समाज संघटना, कलार समाज संघटना, काँग्रेस पक्ष, आझाद समाज पक्ष आदींनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. सरकारच्या धोरणाविरुद्ध यापूर्वी जीआरची होळी, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुंडन आंदोलन, धरणे आंदोलन तसेच निवेदन देऊन शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, शासन शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेण्यास तयार नसल्यानं बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येत असल्याचं आंदोलनाचे प्रणेते महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी सांगितलं.

-----------------------------------------------------

पंचायत पुरस्कार

राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांचं वितरण काल नवी दिल्ली इथं झालं. केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरीत करण्यात आले. महाराष्ट्रातल्या ४ पंचायतींना विविध वर्गात पुरस्कार मिळाले या मध्ये भंडारा जिल्ह्यातल्या इटगाव पुनर्वसन ग्रामपंचायतीनं 'बालस्नेही पंचायत' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

-----------------------------------------------------

पहलाज निहलानी

प्रसिद्ध चित्रपट निर्माते दिग्दर्शक आणि चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचं आज मुंबईत निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. हथकडी या पहिल्या चित्रपटानंतर त्यांनी २१ हिंदी चित्रपट बनवले. २०१५ ते २०१७ या काळात ते सेन्सॉरबोर्डाचे अध्यक्ष होते. तसंच त्यापूर्वी २९ वर्षे असोसिएशन ऑफ पिक्चर्स अँड टिव्ही प्रोग्राम प्रोड्यूसर्स या संघटनेचे अध्यक्ष होते. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ त्यांनी हर हर मोदी, घर घर मोदी ही यू ट्यूब चित्रफीत बनवली होती.

-----------------------------------------------------

जागतिक पर्यावरण दिन

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे पर्यावरण संवर्धन पंधरवड्याची सुरुवात करण्यात येत असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्या सुयोगनगर इथं वृक्षारोपण महामोहिमेचा शुभारंभ होणार आहे. या मोहिमेअंतर्गत शहरात वर्षभरात ५ लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शहरातील सर्व सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकाच दिवशी वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. ५ ते २१ जून दरम्यान तलाव, उद्याने, धार्मिक

स्थळे, दहनघाट आणि वारसा स्थळांच्या स्वच्छतेसह विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसहभागातून शहराचे हिरवे आच्छादन वाढविणे आणि स्वच्छता राखणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. नागपूरकरांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असं आवाहन महापौर निता ठाकरे यांनी केलं आहे.

-------------------------------------------------------

'ग्रीन राइड सायक्लोथॉन

सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांच्या वतीने उद्या 'ग्रीन राइड सायक्लोथॉन'चं आयोजन करण्यात आलं आहे. झिरो माईल, येथून सुरु होणाऱ्या  या सायक्लोथॉनचा मुख्य उद्देश पर्यावरण संरक्षणाचा संदेश जनमानसात पोहोचवणे, नागरिकांमध्ये सायकलिंगची संस्कृती रुजवणे तसेच पर्यावरण संरक्षण, प्रदूषणमुक्ती आणि आरोग्याविषयी जनजागृती करणे हा आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाने सुरक्षेच्या दृष्टीने स्वतःची सायकल आणि हेल्मेट सोबत आणणे बंधनकारक असल्याचं आयोजकांनी स्पष्ट केलं आहे.

-------------------------------------------------------

नीरी पर्यावरण दिन

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सीएसआयआर-नीरी इथं उद्या दुपारी १२.१५ वाजता विशेष कार्यक्रमाचं  आयोजन करण्यात आलं  आहे. यावेळी  टाटा इंस्टीट्यूट फॉर जेनेटिक्स एंड सोसाइटीचे संचालक  डॉ. राकेश मिश्रा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती, पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन आणि संस्थेच्या वैज्ञानिक योगदानाची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. तसेच वायू, जल, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण पुनर्स्थापन क्षेत्रातील विज्ञानाधारित उपाययोजनांवरही यावेळी प्रकाश टाकण्यात येणार आहे.

-------------------------------------------------------

अंमली पदार्थ अटक

नागपूर रेल्वे स्थानकावर रेल्वे सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईत सुमारे १२.३५ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत २.४७ लाख रुपये आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक ८ जवळ संशयास्पद हालचाल करणाऱ्या उत्तर प्रदेशच्या १९ वर्षीय तरुणाची तपासणी केली असता त्याच्या ट्रॉली बॅगेत सहा पाकिटांमध्ये गांजा

आढळून आला. आरोपी दीपकला अटक करून एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

-----------------------------------------------------

वडसा-गडचिरोली

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागांतर्गत वडसा-गडचिरोली नवीन रेल्वेमार्गाच्या कामासाठी ६ आणि ७ जून रोजी प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि तत्सम कामे करण्यात येणार आहेत. या कामांमुळे बल्लारशाह-गोंदिया, गोंदिया-बल्लारशाह, गोंदिया-वडसा तसेच वडसा-चांदा फोर्ट या मार्गावरील सात मेमू आणि प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवासापूर्वी संबंधित गाड्यांची माहिती तपासण्याचं आवाहन केलं आहे. या कामानंतर वडसा यार्डचा थेट जोड गडचिरोली नवीन रेल्वेमार्गाशी होणार असून, त्यामुळे या भागातील रेल्वे संपर्क आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

-----------------------------------------------------

नैर्ऋत्य मोसमी

नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन केरळात झाल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. गेले काही दिवस केरळात पाऊस पडत आहे, मात्र आता मान्सूनचं आगमन झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली आहे. पूर्वी वर्तवलेल्या अंदाजानुसार मान्सूनला काही दिवसांचा उशीर झाला आहे. पुढच्या २ ते ३ दिवसात मोसमी वारे राज्याच्या काही भागात पोहचण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

-----------------------------------------------------

हवामान

विदर्भात आज यवतमाळ जिल्ह्यात ताशी 50 ते 60 किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्या अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर इथं वादळाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून इतर सर्व जिल्ह्यांमध्ये देखील वादळाची शक्यता असल्याने येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

-----------------------------------------------------

सॅफ महिला फुटबॉल

सॅफ महिला फुटबॉल स्पर्धेत भारताने अंतिम फेरीत धडक मारली आहे. गोव्यात मडगाव इथं काल झालेल्या सामन्यात भारतीय संघाने भूतानचा एक - शून्य असा

पराभव केला. भारत सहा वर्षानंतर या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झाला असून, विजेतेपदासाठी भारताचा सामना येत्या शनिवारी बांग्लादेशबरोबर होणार आहे.

-------------------------------------------------------